आगच्छत् शिक्षार्थम्। निर्गच्छत् सेवार्थम्।

# महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा), औरंगाबाद,

## School Leadership Academy

## Maharashtra

## मोड्यूल क्र.१३

### मराठवाड्यातील ग्रामीण भागात प्राथमिक शाळांमधील अध्ययन-अध्यापन प्रक्रियेच्या गुणवत्ता संवर्धनासाठी समाज सहभाग मिळविण्यात शाळाप्रमुखांची भूमिका.

### Role of School Heads in gaining Community Participation for Qquality Enhancement of Teaching-Learning Process in Primary Schools in Rural areas of Marathwada.

## प्रस्तावना -

प्रत्येक मुलाला दर्जेदार व गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळणे हा त्याचा हक्क आहे आणि यासाठी संपूर्ण शिक्षण यंत्रणा कटिबद्ध आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पर्यवेक्षीय अधिकारी, मुख्याध्यापक, शिक्षक, पालक यांची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. शिक्षण हे परिवर्तनाचे प्रभावी माध्यम मानले गेले आहे आणि शिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांमध्ये इष्ट परिवर्तन घडवून सुजाण नागरिक निर्माण करणे व राष्ट्र विकास साधणे हा शिक्षणाचा मुख्य हेतू आहे.

शाळेचा नेता म्हणून त्या शाळेचा मुख्याध्यापक हा एक जबाबदार घटक आहे. आपल्या नेतृत्व कौशल्याने शाळेत चांगले बदल घडवून आणणे व विद्यार्थ्यांना योग्य शैक्षणिक वातावरण निर्माण करून देणे हे मुख्याध्यापकांकडून अभिप्रेत आहे. यासाठी शालेय नेतृत्वाला विविध पातळ्यांवर प्रयत्न करावे लागतात. यांपैकी एक महत्त्वपूर्ण घटक आहे, तो म्हणजे शाळा विकासासाठी समाजाचा सहभाग मिळविणे. शाळा आणि समाज हे दोन अविभाज्य घटक आहेत, असे म्हणतात की, शाळेला गावाचा आधार असावा व गावाला शाळेचा अभिमान असावा. त्यासाठी शाळेच्या कार्यामध्ये लोकांचा व समाजाचा सहभाग घेणे अगत्याचे ठरते.

लोकसहभाग केवळ आर्थिक स्वरूपातच घेता येतो असे नव्हे, तर श्रमदान, विद्यार्थ्यांच्या अध्यापन कार्यात मदत करण्यासाठी विषय मित्र म्हणून गावातील सेवानिवृत्त व्यक्ती, शिक्षणप्रेमी, उच्च शिक्षित युवक/युवतींची मदत घेणे, शाळेसाठी आवश्यक गरजांची पूर्ती करण्यासाठी शाळा व्यवस्थापन समितीच्या माध्यमातून गावकऱ्यांची मदत घेऊन शाळेसाठी लागणारी साधने मिळविणे अशा विविध स्वरूपांमध्ये समाज सहभाग मिळविता येतो. महाराष्ट्र शासनाने 16 मे 1996 व 24 ऑगस्ट 2010 रोजी पारित केलेल्या परिपत्रकांन्वये तसेच शाळा संहितेतील नियम क्रमांक दोन, आणि बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम 2009 (RTE-2009) अन्वये समाज सहभागाद्वारे म्हणजेच शिक्षक-पालक सभेच्या माध्यमातून, शालेय वातावरणाशी संबंधित तसेच विद्यार्थी व शिक्षकांच्या समस्या सोडविणे असे ध्येय निश्चित करण्यात आले आहे. वरील सर्व संदर्भांचा विचार करता, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळेने समाज/पालक किंवा लोकसहभाग घेणे अपेक्षित आहे. त्यादृष्टीने समाज सहभाग मिळविण्यात शालेय नेतृत्वाची भूमिका, त्यांना येणाऱ्या अडचणी आणि समस्या जाणून घेणे, त्यावर उपाययोजना सुचविणे आणि या क्षेत्रात ज्या मुख्याध्यापकांनी चांगले काम केले आहे, अशा मुख्याध्यापकांचा परिचय सर्वांना करून देणे, त्यांच्या कार्यपद्धतीचा परिचय करून देणे हा या मोड्यूल निर्मितीचा मुख्य उद्देश आहे.

## मोड्यूल अध्ययनाची उद्दिष्टे -

1. समाज सहभागासंदर्भात शालेय नेतृत्वाची भूमिका समजून घेणे.
2. समाज सहभाग मिळविण्यात यशस्वी झालेल्या शालेय नेतृत्वाच्या कार्याचा अभ्यास करणे.
3. शालेय गुणवत्ता संवर्धनासाठी समाज सहभाग मिळविण्यासंदर्भात शालेय नेतृत्वाचा योग्य दृष्टिकोन विकसित होण्यास मदत करणे.

## समाज सहभाग या क्षेत्राची संकल्पना -

शाळेत शिक्षण प्रक्रिया चालते. शिक्षण प्रक्रियेत अध्ययन-अध्यापनाबरोबरच इतर उपक्रम, सहशालेय कार्यक्रम चाललेले असतात; जे पुस्तकी ज्ञानाबरोबरच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उपयुक्त असतात. पुस्तकी ज्ञानाच्या जोडीला विद्यार्थ्यांचा शारीरिक, मानसिक, भावनिक, बौद्धिक, सौंदर्यात्मक, सर्जनात्मक विकास करणे देखील अगत्याचे असते, मानवी जीवनातील गुंतागुंतीच्या बंधांचे व व्यवहारांचे ज्ञानही मिळवायचे असते. त्यातून विद्यार्थ्यांचे एक परिपूर्ण व्यक्तिमत्त्व घडवायचे असते, हे सर्व प्राप्त करण्यासाठी शाळा, शिक्षणप्रक्रिया महत्त्वाचे माध्यम आहे.

सामाजिक परिवर्तन व सामाजिक विकास योग्य पद्धतीने होण्यासाठी शाळेसारखे दुसरे माध्यम नाही. शिक्षण आणि समाज यांच्यात सहसंबंध प्रस्थापित व्हायला हवा. शिक्षणाची ध्येये आणि उद्दिष्टे समाजाला माहीत असायला हवीत आणि समाजाच्या आशा-आकांक्षा व गरजा शिक्षणाने जाणून घ्याव्यात, पण हे तेव्हाच शक्य होईल जेव्हा समाज शाळेशी संपर्क ठेवील आणि शाळा समाजाच्या संपर्कात राहील, म्हणून प्राथमिक शिक्षण हा पायाभूत शिक्षणाचा भाग असल्याने व शाळा हा समाजाचा घटक असल्याने, शाळेच्या सर्वांगीण प्रगतीसाठी समाज सहभागाची गरज आहे. शालेय गुणवत्ता विकासासाठी, 100% पटनोंदणी व उपस्थितीसाठी, शाळेच्या आवश्यक भौतिक सुविधांसाठी शासनाच्या प्रयत्नांबरोबरच समाजाचे सहकार्य आणि सक्रिय सहभागाची आवश्यकता असते. समाजाने गावाच्या सध्याच्या स्थितीत व भविष्यात आपल्या गावात कोणत्या प्रकारची शिक्षणाची सोय आवश्यक आहे, गावाच्या शैक्षणिक गरजा कोणत्या, याचा शोध घेऊन नियोजन करणे आवश्यक ठरते म्हणूनच शिक्षणात समाज सहभाग हे एक प्रभावी साधन आहे, ज्याच्या माध्यमातून शालेय विकास साधण्यासाठी चालना मिळते.

## समाज सहभाग याबाबत शालेय नेतृत्वासमोर असलेली आव्हाने-

**अ) विद्यार्थ्यांशी संबंधित आव्हाने :-**

1. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीबद्दल समाजाचे/पालकांचे सहकार्य आवश्यक असते परंतु याबाबत विद्यार्थ्यांकडे निरोप पाठवून देखील पालक चर्चेसाठी शाळेत येत नाहीत. फार मोजके पालक याबाबत प्रतिसाद देतात.
2. विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता संवर्धनासाठी शासन स्तरावरून व शाळेच्या मुख्याध्यापक, शिक्षकांकडून यथाशक्ती प्रयत्न केले जातात, मात्र तरीदेखील काही बाबींसाठी समाजाच्या सहभागाची गरज असते उदा. भौतिक सुविधांची कमतरता असणे, प्रवेशपात्र 100% विद्यार्थ्यांना शाळेत दाखल करणे, शाळेत विद्यार्थ्यांची 100 % उपस्थिती ठेवणे, विद्यार्थ्यांची विशेषतः मुलींची गळती थांबविणे, विद्यार्थ्यांचे स्थलांतर रोखणे इत्यादी.
   समाज सहभागाशिवाय विद्यार्थ्यांना सर्व सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यात शाळाप्रमुखांना मर्यादा पडतात.

**ब) शिक्षकांशी संबंधित आव्हाने :-**

1. शाळेच्या आणि विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी समाज संपर्क ठेवणे, समाजाचा सहभाग मिळविणे हे शिक्षकांचे कर्तव्य आहे, परंतु समाज संपर्क करण्यासाठी शिक्षकांकडून गांभीर्याने प्रयत्न होत नाहीत. केवळ जुजबी,औपचारिक प्रयत्न केले जातात.
2. जे पालक शाळेत येतात त्यांना शिक्षकांकडून योग्य वागणूक मिळत नाही.
3. समाज संपर्क करणे किंवा शाळेसाठी समाज सहभाग मिळविणे ही फक्त मुख्याध्यापक म्हणजे शाळा प्रमुखांचीच जबाबदारी आहे असे बहुसंख्य शिक्षकांना वाटते.
4. शिक्षकांचे समाज सहभाग मिळविण्याच्या कामी सहकार्य नसणे.

समाज सहभाग मिळविण्यात शाळेतील सहकारी शिक्षकांचे असहकार्य, अनास्था असणे, नकारात्मक मानसिकता असणे हे शाळाप्रमुखांच्या दृष्टीने मुख्य आव्हान आहे.

### क) **पालकांशी संबंधित आव्हाने :-**

1. प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी व गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी शिक्षक कृतीबरोबरच पालकांचा सहभाग व सहकार्य असणे ही देखील अत्यंत आवश्यक बाब आहे, परंतु प्रत्यक्षात बहुतांश पालकांची शाळेशी तोंडओळखही नसते. पालकांना ज्या शाळेत आपला पाल्य जातो, त्या शाळेची फक्त इमारत माहीत असते आणि तीही त्यांनी केवळ बाहेरून पाहिलेली असते.
2. प्रत्यक्षात शाळेत काय चालते ? शिक्षणाची उद्दिष्टे कोणती आहेत ? पुस्तकी अध्यापनाशिवाय शाळेत आणखी काय उपक्रम चालतात ? मुख्याध्यापक कोण ? त्यांच्या जबाबदाऱ्या कोणत्या ? शाळेत शिक्षक-मुख्याध्यापक या घटकांबरोबरचे इतर घटक कोणते ? शाळेचे कार्य कसे चालते ? अशा प्रश्नांविषयी बरेच पालक अनभिज्ञ असतात. त्यांना याबाबत काही गांभीर्यही नसते.
3. शालेय शिक्षणप्रक्रिया, विविध उपक्रम, पाल्याची प्रगती यांबाबतीत माहिती घेण्यासाठी, सहकार्य करण्यासाठी, शाळेत जाऊन मुख्याध्यापक-शिक्षक यांच्याशी संपर्क साधणे हे पालकांचे कर्तव्य आहे, पण हे सर्व पालकांना सहजसाध्य होत नाही. सर्वच पालक जबाबदारीने शाळेला भेट देत नाहीत.
4. पालकांची अशी भावना असते की, आपल्या पाल्याचे नाव शाळेत टाकले म्हणजे आपली जबाबदारी संपली, आता सर्व जबाबदारी आहे ती शाळेची. पालकांची शाळेप्रति अशी भूमिका असणे हे मुख्याध्यापक व शिक्षकांच्या दृष्टीनेआव्हानच आहे.

### ड) समाजाशी संबंधित आव्हाने :-

1. समाज आणि शिक्षण यांचा सहसंबंध असणे गरजेचे आहे असे आपण म्हणतो, पण प्रत्यक्षात बहुतांशी आपल्याला चित्र नेमके उलटे दिसते. शाळेसाठी खूप कमी गावांमध्ये गावकऱ्यांचा सक्रिय सहभाग मिळतो.
2. विद्यार्थ्यांचे शिक्षण म्हणजे केवळ शासन व शाळेचीच जबाबदारी आहे अशा भावनेमुळे समाजाचा शिक्षणात सहभाग अतिशय कमी दिसतो.
3. समाज हा शिक्षणापासून तसा अलिप्तच आहे. समाजाची ही अलिप्तता शाळा व समाज या दोघांच्याही दृष्टीनेघातक आहे.
4. समाजाने शाळेच्या शैक्षणिक प्रक्रियेत, सहशालेय उपक्रमांत सहभाग देणे अपेक्षित आहे परंतु शाळेसाठी समाजाची साथ सहजासहजी मिळत नाही.

उपरोक्त बाबींचा विचार करता शाळेच्या सर्वांगीण प्रगतीसाठी समाजाचा सहभाग मिळविणे हे शालेय नेतृत्वापुढील एक मोठे आव्हान असते.

### यशस्वीपणे समाज सहभाग मिळवलेल्या मुख्याध्यापकांची यशोगाथा -

**मुख्याध्यापकांचे नाव :- श्री. सतीश सावंत,** जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, तारुपिंपळवाडी केंद्र-लोहगाव, तालुका- पैठण, जिल्हा औरंगाबाद. **UDISE NO. 27190517401**

### प्रस्तावना -

जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, तारुपिंपळवाडी ही अगोदर चौथीपर्यंत वर्ग असलेली अगदी छोटी शाळा होती. गावाची पार्श्वभूमी म्हणाल, तर हे एक पुनर्वसित गाव; जायकवाडी धरण प्रकल्पात मुळ गाव संपादित झालं आणि धरणाच्या बॅकवॉटर परिसरात हे नवीन गाव वसलं. पिढीजात शेतीचा व्यवसाय असलेली कुटुंबे आणि शिक्षणाचे फारसे महत्त्व वाटत नसणारे गाव. पहिली ते चौथीपर्यंत अगदी जुन्या दोन खोल्या. तिथे ना कसल्या बोलक्या भिंती, ना वृक्षारोपण, ना स्वच्छता.असे वर्ष 2011 पर्यंत छोटेसेच मैदान आणि मोजक्याच सोयी-सुविधा असलेल्या या शाळेत विद्यार्थी शिक्षण घेत होते. पुढे सतीश सावंत सर, लाड सर, सानप सर यांच्या रूपाने नवीन शिक्षकांची टीम आली आणि शाळेची गुणवत्ता, प्रशासन व भौतिक सुविधा यांची प्रगती सुरू झाली.

## समस्येवर मात करताना सुरूवातीपासून विविध टप्प्यांतून मुख्याध्यापकांनी केलेले प्रत्यक्ष कार्य, शिक्षकांचा सहभाग व सहकार्य.

'Slow but steady wins the race' या उक्ती प्रमाणे सावंत सरांच्या मार्गदर्शनाखाली शाळेचे कामकाज सुरू झाले. शाळेची बकाल अवस्था, सुमार गुणवत्ता आणि समाजाची अनास्था पाहून नवीनच रुजू झालेले श्री. सावंत अस्वस्थ झाले. त्यांनी आपल्या सहकारी शिक्षकांशी चर्चा केली आणि शाळेत चांगला बदल घडवून आणण्याचा संकल्प केला. त्यांनी सुरूवातीला गावकऱ्यांना काहीही न बोलता कृती करण्यावर भर दिला. मुख्याध्यापक व सर्व शिक्षकांनी मिळून विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी अथक परिश्रम घेतले. शिक्षकांच्या मेहनतीमुळे मुलांमध्ये प्रगती दिसू लागताच पालकवर्ग आशावादी बनला. पालक जिल्हा परिषद शाळेकडे सन्मानाने पाहू लागले. याच काळात सगळीकडे English School चे फॅड वाढू लागले होते आणि त्यामुळे झपाट्याने गावागावातील जिल्हा परिषदेच्या शाळांमधील पटसंख्या कमी व्हायला लागली. तारुपिंपळवाडीतही इंग्रजी माध्यमाच्या खाजगी शाळेकडे पालकांचा ओढा वाढू लागला होता. शाळेतील बऱ्याच विद्यार्थ्यांनी इंग्रजी शाळेत प्रवेश घेतला. ही गळती थांबविण्यासाठी मुख्याध्यापक श्री. सावंत यांनी पालकांशी सुसंवाद साधला, मुलांना गावातीलच शाळेत ठेवण्याची विनंती केली, त्यांना गुणवत्तेची हमी दिली. जून 2012 पासून शाळा प्रशासनाने पहिलीपासून सेमी इंग्रजी माध्यम सुरू करण्याचा ठराव केला. यानंतर मुख्याध्यापक व शिक्षकांनी वर्षभर प्रचंड मेहनत घेतली, विद्यार्थी गुणवत्तेवर भर दिला. परिणामी विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेतील बदल पालकांना जाणवला, त्यामुळे इंग्रजी शाळेत प्रवेशित झालेली मुले पुन्हा गावातील शाळेत आली. शाळेची फक्त 47 इतकी असलेली विद्यार्थी पटसंख्या वाढून 100 च्या पुढे गेली.

सन 2011 ते 2013 या दोनच वर्षात पालकांना मुलांच्या गुणवत्तेतील वाढ दिसायला लागली. विद्यार्थी गुणवत्ता वाढीमुळे समाज आणि शाळा यांच्यात चांगला समन्वय निर्माण झाला. यानंतर श्री. सावंत यांनी शाळेसाठी समाज सहभाग मिळविण्याच्या दृष्टीनेपावले टाकण्यास सुरूवात केली. समाज शाळेशी जोडला जावा, लोकांचा शाळेशी जास्तीत जास्त संपर्क यावा म्हणून त्यांनी जाणीवपूर्वक विविध सहशालेय उपक्रमांचे आयोजन केले. उदा. विविध सण, उत्सव शाळेत साजरे करणे, सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन, स्नेहसंमेलन आयोजन, आदर्श विद्यार्थी निवड इत्यादी. त्यामुळे आपोआपच पालकांचा शाळेतील सहभाग वाढला. विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून आपल्या पाल्यांचे गुण, कौशल्य पाहून शाळेप्रति पालकांची आस्था निर्माण झाली. नियमितपणे होणाऱ्या शालेय व्यवस्थापन समितीच्या बैठकांमध्ये मुख्याध्यापक श्री. सावंत यांनी वेळोवेळी ग्रामस्थांना कळकळीने शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. शालोपयोगी गरजांची पूर्तता करण्यासाठी स्वतः मुख्याध्यापक व शिक्षकांनी प्रथम पुढाकार घेतला, वर्गणी गोळा केली आणि मग समाजाला आवाहन केले, त्याचा अतिशय सकारात्मक परिणाम झाला. आपल्या शाळेसाठी, आपल्या मुलांसाठी मुख्याध्यापक व शिक्षक निस्वार्थीपणे धडपड करीत आहेत हे लोकांना पटले, त्यामुळे दोन वर्षांच्या काळातील शिक्षकांच्या चांगल्या कामांमुळे समाजाचा शिक्षकांवरील विश्वास वाढला आणि मोठ्या प्रमाणावर समाज सहभाग मिळण्यास सुरूवात झाली, समाज शाळेसाठी हवी ती मदत देण्यासाठी तयार झाला.



**विद्यार्थ्यांचा विविध शालेय कृतींमध्ये सहभाग**

सावंत सर, त्यांचे सहकारी शिक्षक व पालक, शालेय व्यवस्थापन समिती या सर्वांच्या एकीमुळे सन 2014 साली जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेला ISO मानांकन मिळाले. पैठण तालुक्यातील ISO मानांकन मिळविणारी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तारुपिंपळवाडी ही दुसरी शाळा ठरली. यासाठी तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी, गटशिक्षण अधिकारी यांनी शाळेचे कौतुक केले. सन 2014 सालीच शाळेने भव्य अशा सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले. शिक्षकांचा हा कार्यक्रम, विद्यार्थ्यांचे कला-गुण पाहून पालक एवढे आनंदले की, त्यांनी सर्वानुमते ठरविले की, आता सांस्कृतिक कार्यक्रम ग्रामपंचायतीच्या मोठ्या मैदानात दरवर्षी साजरा करायचा. तारुपिंपळवाडीचे स्टेज, नेपथ्य, सजावट, नाटिका, नृत्य, कला-गुण इत्यादी बाबी पाहण्यासाठी पंचक्रोशीतील लोकसुद्धा गॅदरिंग बघण्यासाठी येत असतात. शैक्षणिक क्षेत्राबरोबरच क्रीडा क्षेत्रातही शाळेचे नाव गाजलेले आहे. बुद्धिबळ व खो-खो या खेळांमध्ये विभागीय व राज्य पातळीपर्यंत विद्यार्थी पारितोषिके घेऊन आली आहेत. मुलींचा खो-खो संघ तर एवढा तरबेज आहे की, सर्व जिल्हा परिषद शाळांमधून फक्त तारुपिंपळवाडीचा संघच विभागीय स्पर्धेत पात्र ठरला होता. बुद्धिबळात देखील विभागीय पातळीवर शाळेतील मुलांनी उज्ज्वल यश मिळविले आहे.

समाजाच्या सहभागाने व मुख्याध्यापक आणि शिक्षकांच्या पुढाकाराने येथे नामांकित खाजगी शाळेत मिळणाऱ्या सर्व सुविधा देण्याचा यशस्वी प्रयत्न झाला आहे. शाळेत प्रथमोपचार पेटी उपलब्ध आहे व विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी, वजन, उंची, BMI यांची नोंद केली जाते. शिष्यवृत्ती परीक्षा, नवोदय परीक्षा, प्रज्ञाशोध परीक्षा अशा विविध स्पर्धा परीक्षांत विद्यार्थी भाग घेतात. शिस्त, सभाधीटपणा, नीट-नेटकेपणा, वैज्ञानिक दृष्टिकोन विद्यार्थ्यांमध्ये रुजू लागला आहे. विद्यार्थी स्वतःची मते मांडतात, वक्तृत्व स्पर्धा, सामान्यज्ञान स्पर्धा, गायन स्पर्धा, कविता लिहिणे, मेहंदी, रांगोळी, कार्यानुभव या उपक्रमात हिरिरीने सहभाग घेतात. क्रीडासप्ताह, आनंदनगरीचे आयोजन केले जाते. इंग्रजी बोलण्याचा सराव व्हावा म्हणून शुक्रवार शनिवार केवळ इंग्रजीत बोलावे असा नियम केला आहे. विविध अभ्यासगट व विद्यार्थी गट करून विद्यार्थ्यांना नेतृत्व गुण विकसित करण्याची संधी दिली जाते.पालकांच्या प्रबोधनासाठी 'एक दिवस शाळा पालकांची' हा अभिनव उपक्रम घेण्यात येतो. या उपक्रमांतर्गत शिक्षण क्षेत्रातील एक मार्गदर्शक व्याख्यानासाठी बोलावले जातात आणि सर्व पालक ऐकण्यासाठी येतात. विद्यार्थ्यांना बचतीची सवय लागावी व बँकिंग प्रणालीचा परिचय व्हावा म्हणून शाळेमध्ये 'अंकुर बचत बँक' हा उपक्रम सुरू केलेला आहे. अशा विविध सहशालेय उपक्रमांमुळे आणि विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेमुळे शिक्षक व पालक यांची विचारधारा जुळत गेली. शिक्षकांनी आपल्या कामाद्वारे पालकांचा, गावकऱ्यांचा विश्वास संपादन केला. मोठया प्रमाणावर समाजाचा सहभाग मिळविला आणि त्यामुळे या धरणग्रस्त गावात विद्यार्थी गुणवत्तेचे रोपटे फुलले. स्थानिक ग्रामपंचायत पदाधिकारी व राजकीय पुढारी यांनी देखील राजकीय मतभेद बाजूला ठेवून शाळेच्या प्रगतीसाठी एकत्र येण्याचे ठरविले. ही सर्व मुख्याध्यापक व शिक्षकांच्या अथक प्रयत्नांची किमया होती.

**पालक, समाज, SMC सहभाग**

सुरूवातीलाच मुख्याध्यापकांनी ग्रामस्थांना शाळेत राजकारण करू नये असे आवाहन केले, त्यामुळे आजही तारुपिंपळवाडीमध्ये शाळा म्हटले की, तिथे कुठलेही राजकारण किंवा राजकीय वाद, मान-अपमान, श्रेयवाद होत नाही. सन 2013 साली शाळेला मैदान कमी पडत असल्यामुळे समाजाच्या सहभागाने शाळेची अतिक्रमित जागा मोकळी करून शाळेचे मैदान वाढविण्यात आले. शाळेसाठी वर्गखोल्या कमी पडत असल्यामुळे ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांनी पाठपुरावा करून दोन स्लॅबच्या वर्गखोल्या मंजूर करून घेतल्या व बांधून दिल्या. समाज सहभागातून शाळेत सन 2014 ला ई-लर्निंग सुविधा, प्रोजेक्टर उपलब्ध करून देण्यात आले आहे. शाळेत इयत्ता चौथी पर्यंतचे वर्ग असल्यामुळे पुढील वर्ग वाढविण्याचे ठरले त्यानुसार सन-2015 मध्ये पाचवीच्या वर्गास मान्यता मिळाली, सन 2016 ला सहावी, सन 2017 ला सातवी व सन 2018 ला आठवीच्या वर्गास मान्यता मिळाली. आज शाळेतील पहिली ते आठवीचे सर्व विद्यार्थी सेमी इंग्रजी माध्यमात शिक्षण घेतात.



**समाज सहभाग मिळविण्यासाठी जि.प.प्रा.शा. तारूपिंपळवाडी शाळेकडून राबविले जाणारे उपक्रम**

मागील वर्षी म्हणजे सन 2020 ला वाबळेवाडी जि. पुणे येथील जिल्हा परिषदेच्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या शाळेची ख्याती ऐकून त्या शाळेची प्रगती व शाळेतील सोयी-सुविधा, सुधारणा पाहण्यासाठी शालेय व्यवस्थापन समितीच्या सदस्यांशी चर्चा करून वाबळेवाडीच्या शाळेस भेट देण्याचे श्री. सावंत यांनी नियोजन केले व वाबळेवाडी आंतरराष्ट्रीय शाळेला शिक्षक, शालेय व्यवस्थापन समिती सदस्य आणि पालकांसह भेट दिली. समाजाच्या सक्रिय सहभागामुळे वाबळेवाडी शाळेत झालेल्या सुधारणा व परिवर्तन पाहून, भेट देणारे शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य आणि पालक प्रभावित झाले व त्यापासून प्रेरणा घेत सर्वांनी मिळून वाबळेवाडीहून परत येताच शाळेसाठी 1000 स्क्वेअर फुटाचे भव्य सभागृह लोकवर्गणीतून बांधून दिले. या सभागृहात प्रोजेक्टर, स्पीकर, विद्युत उपकरणे बसविण्यात आली आहेत.



**विविध उपक्रमात तारूपिंपळवाडीतील शिक्षक, गावकरी/शालेय शिक्षण समिती यांचा सहभाग**

सांस्कृतिक कार्यक्रमात सर्व ग्रामस्थ मनापासून सहभागी होतात आणि विद्यार्थ्यांच्या कला-गुणांना दाद देतात. विद्यार्थ्यांना रोख स्वरूपात बक्षीस देण्याची ग्रामस्थांमध्ये चढाओढ लागते. मागील वर्षी बक्षीस स्वरूपात रुपये 95,000 इतकी रक्कम जमा झाली. ही सर्व रक्कम सर्वसहमतीने शाळा विकास निधीला देण्यात आली. गावातील 80 पालकांनी उत्स्फूर्तपणे पुढाकार घेऊन सतत दोन वर्षे दरमहा रुपये 500 वर्गणी जमा केली, या बरोबरच मुख्याध्यापक व शिक्षकांनी देखील रोख रकमेच्या स्वरूपात नियमितपणे आपले योगदान दिले. यातून शाळेसाठी सिमेंट रस्ता, गेट, कंपाऊंड, मुला-मुलींसाठी स्वतंत्र शौचालये, बोअरवेल, बागबगीचा, पिण्याच्या शुद्ध पाण्यासाठी RO system वॉटर प्युरिफायर, हात धुण्यासाठी हँडवॉश स्टेशन, ऑक्सिजन झोन (डॉ.अब्दुल कलाम ऑक्सिजन बगीचा ) या सुविधा निर्माण केल्या गेल्या. विद्यार्थ्यांसाठी भरपूर खेळ साहित्य घेतले आहे. दरवर्षी विद्यार्थ्यांसाठी शालेय गणवेशाची शासकीय तरतूद येते परंतु ही तरतूद सर्व मुलांसाठी प्राप्त होत नाही. त्यामुळे शाळेतील काही मुले शालेय गणवेशापासून वंचित राहतात. ही बाब लक्षात घेऊन शासकीय तरतुदीमध्ये समाज सहभागाद्वारे भर टाकून शाळेतील सर्वच विद्यार्थ्यांना खाजगी शाळेप्रमाणेच आकर्षक व दर्जेदार असे प्रत्येकी दोन गणवेश, ओळखपत्र, टाय, बूट व सॉक्स दिले जातात. समाज सहभागातूनच शाळेत सन 2018 मध्ये सुसज्ज असे ग्रंथालय निर्माण केले आहे. इयत्तावार नियोजन करून शाळेतील मुलांना पुस्तके वाचण्यास दिली जातात. त्यामुळे विद्यार्थ्यांना अवांतर वाचनाची गोडी लागली आहे.

शाळेतर्फे दरवर्षी एकूण सर्वांगीण निकष लावून, आदर्श विद्यार्थी, आदर्श विद्यार्थिनी व आदर्श पालक असे पुरस्कार 26 जानेवारी रोजी दिले जातात. या पुरस्काराचे स्वरूप प्रत्येकी रुपये 2000 रोख, ट्रॉफी, शाल व श्रीफळ असे आहे. पुरस्कारांसाठी दरवर्षी एकूण साधारणतः 10,000 रुपये खर्च येतो हा संपूर्ण खर्च LIC चे थोरे साहेब करतात. या पुरस्कारांमुळे प्रत्येकाला वाटते की, आपल्यालाही हा पुरस्कार मिळावा आणि त्या प्रेरणेतून विद्यार्थी व

पालक चांगले काम करण्याचा प्रयत्न करतात. याशिवाय गावातील JCB मालक शाळेच्या कामासाठी कुठलाही मोबदला घेत नाहीत. गावातील सर्व कारागीर, मजूर, बांधकाम मिस्तरी हे वस्तुरूपाने, श्रमदानाच्या माध्यमातून शाळेसाठी यथाशक्ती योगदान देतात. कोरोना काळात विद्यार्थ्यांच्या शिकण्यात खंड पडू नये म्हणून शाळेच्या माजी विद्यार्थ्यांनी विषयमित्र म्हणून मोलाची भूमिका बजावली व विद्यार्थ्यांना अध्यापन केले.

अशा प्रकारे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तारुपिंपळवाडी या शाळेस पालक, समाज व शालेय व्यवस्थापन समिती यांचे भरीव स्वरूपाचे सहकार्य लाभले आहे.आज शाळेची पटसंख्या 200 च्या जवळ गेली आहे. शिक्षक, पालक, समाज व शालेय व्यवस्थापन समिती यांच्या समन्वयातून मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी जि.प.प्रा.शा.तारुपिंपळवाडी प्रगतिपथावर आहे.

**समाज सहभागातून प्रस्तावित/नियोजित असलेली कामे**

1. शाळेची कमान उभारणे.
2. शाळेत डिजिटल वाचनालय सुरू करणे.
3. विज्ञान, भाषा, कला-कुसर, क्रीडा अशा विविध विषयांशी संबंधित प्रयोगशाळा (Lab) तयार करणे.
4. विद्यार्थ्यांसाठी Indoor खेळांची सुविधा उपलब्ध करणे.
5. कृषी प्रयोग केंद्र सुरू करणे – यासाठी एका ग्रामस्थांनी आपली स्वतःची अर्धा एकर जमीन दिलेली आहे. या कृषी प्रयोग केंद्राच्या माध्यमातून आधुनिक शेतीसंबंधी सर्व प्रयोग राबविता येतील व ते विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष पाहता येतील, समजून घेता येतील तसेच शालेय पोषण आहारासाठी लागणारा भाजीपाला या केंद्रातून सेंद्रिय पद्धतीने पिकविला जाईल.

   उपरोक्त सर्व कामे आगामी काळात समाज सहभागातून पूर्ण करण्याचे नियोजित आहे.

**समस्या दूर करण्यासाठी शासनाच्या प्रत्यक्ष सुरू असलेल्या विविध लाभाच्या योजना**

विद्यार्थी लाभासाठीच्या शासनाच्या सर्व योजना, जसे स्कॉलरशिप, शालेय पोषण आहार, पुस्तक वाटप, गणवेश वाटप, दिव्यांग विद्यार्थी योजना अशा सर्व योजनांची शाळेत काटेकोरपणे व प्रभावी अंमलबजावणी केली जाते. शासनाकडून प्राप्त निधीमधून शाळेसाठी किचन शेड बांधण्यात आली आहे. शाळेमध्ये नुकतेच एप्रिल 2020 मध्ये शासनाकडून 'विज्ञान केंद्र' सुरू करण्यात आले आहे. जिल्हा परिषद, औरंगाबाद व संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांच्या मार्फत या एकात्मिक विज्ञान केंद्रास विज्ञानाचे संपूर्ण साहित्य मिळाले आहे. शासनामार्फतच शाळेत सन 2020 मध्ये जवळपास दीड एकर जागेवर डेन्स फॉरेस्ट प्रोजेक्ट सुरू करण्यात आला आहे. याशिवाय शाळेची गुणवत्ता, शाळेसाठी समाजाचे मिळणारे सहकार्य, मुख्याध्यापक व शिक्षकांचे एक संघ म्हणून काम करणे, शाळेत राबविले जाणारे विविध सहशालेय उपक्रम, शाळेत घडून आलेले चांगले बदल, या सर्व बाबींची दखल घेऊन चालू वर्षी आंतरराष्ट्रीय मॉडेल स्कूल साठी जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्यामार्फत तारुपिंपळवाडी शाळेची निवड करण्यात आली आहे.

**चिंतनात्मक प्रश्न**

1. शालेय शिक्षणात समाजाच्या सहभागाची गरज का आहे ?
2. समाजाची शालेय शिक्षणाबाबत अलिप्तता दिसून येते, तुमच्या मते त्याची कारणे काय असावीत ?
3. पटनोंदणी, उपस्थिती, गुणवत्ता विकास यात समाजाचे सहकार्य कसे घेता येईल ?
4. पालक-शिक्षक संघ, माता-पालक संघ यांची गरज व फायदे स्पष्ट करा.
5. गावाच्या शैक्षणिक गरजांचे सर्वेक्षण कसे करता येईल? यासाठी समाज सहभाग कसा घ्याल?
6. लोकशिक्षण कसे देता येईल?
7. शाळा हे समाज घडविण्याचे केंद्र कसे बनविता येईल ?

**विचार करू या आणि चर्चा करू या**

मुख्याध्यापक व शिक्षकांप्रति असलेल्या समाजाच्या प्रेमामुळे व विश्वासामुळे तारूपिंपळवाडीच्या शाळेत कोणते बदल घडून आले ?

**शाळा विकास आराखडा नियोजन**

सध्या तुम्ही कार्यरत असलेल्या शाळेतील परिस्थितीचा सर्वंकष विचार करून, शालेय व्यवस्थापन समितीच्या समन्वयाने शाळा विकास आराखडा तयार करा.

**संबंधित समस्येस सामोरे जाताना कृती करण्याचे टप्पे**

- शाळेसाठी समाज सहभाग प्राप्त करण्याकरिता सर्वप्रथम समाजाशी सुसंवाद साधणे.
- मुख्याध्यापक आणि सहकारी शिक्षकांमध्ये समन्वय, योग्य ताळमेळ असला पाहिजे. पालकांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देणे, शाळा व्यवस्थापन समितीच्या माध्यमातून गावकऱ्यांची मदत घेणे, यातून समाज सहभाग मिळविणे सुलभ होते.
- गावकऱ्यांशी नेहमी संपर्क साधून त्यांच्याशी सुसंवाद प्रस्थापित करणे, त्यांच्या सुख-दुःखात सहभागी होऊन समाजाशी समरस होणे तसेच आपल्या वर्तनाद्वारे समाजाचा विश्वास संपादन करणे आणि त्यांची सकारात्मक मानसिकता तयार करणे.
- शिक्षणाच्या माध्यमातून शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी शालेय व्यवस्थापन समितीच्या मदतीने शैक्षणिक गरजांचे सर्वेक्षण करून अल्पकालीन व दीर्घकालीन नियोजन करणे.
- शाळेच्या विविध गरजा, शाळेसाठी लागणारी साधने समाज सहभागातून मिळविणे.
- लोकसहभाग केवळ आर्थिक स्वरूपातच घेता येतो असे नव्हे, तर वस्तुरूपाने शाळेसाठी मदत मिळविणे, श्रमदान, विद्यार्थ्यांच्या अध्यापन कार्यात मदत करण्यासाठी विषयमित्र म्हणून गावातील युवक/युवतींची मदत घेणे अशा विविध स्वरूपात लोकसहभाग मिळविणे.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मध्ये समाज सहभाग वाढविण्यासाठी केलेल्या शिफारसी**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मध्ये समाज सहभागाविषयी विविध शिफारसी केलेल्या आहेत त्या खालीलप्रमाणे

- राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 च्या तत्त्वांमध्ये समाज सहभागाविषयी नमूद आहे की, पुरेशी गुंतवणूक करून एक मजबूत आणि चैतन्यदायी सार्वजनिक शिक्षण प्रणाली विकसित केली जाईल व त्यासोबतच उपयोगी व्यक्तिगत सहभागास आणि समाज सहभागास प्रोत्साहन दिले जाईल.
- **गळतीचे प्रमाण कमी करणे व सर्व स्तरावर शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करणे** विभाग ३ यामध्ये 3.7 नुसार नमूद आहे,विद्यार्थ्यांना अध्ययनामध्ये मदत करण्यासाठी माजी विद्यार्थी आणि समाजातील स्वयंसेवक यांना सहभागी करून घेतले जाईल तसेच त्यांची प्रत्येक विद्यार्थ्यासाठी शिकवणी, साक्षरता, अतिरिक्त मदतीची सत्र घेणे, शिक्षकांना अध्यापनात मार्गदर्शन आणि मदत, विद्यार्थ्यांना व्यवसायासंबंधी मार्गदर्शन इत्यादी उपक्रमांत मदत घेतली जाईल. या उपक्रमांसाठी क्रियाशील व आरोग्यसंपन्न ज्येष्ठ नागरिक, शाळेचे माजी विद्यार्थी आणि स्थानिक समाजातील सदस्य यांची योग्य पद्धतीने मदत घेतली जाईल. यासाठी साक्षर स्वयंसेवक,सेवानिवृत्त वैज्ञानिक/सरकारी/निमसरकारी कर्मचारी, माजी विद्यार्थी आणि शिक्षणतज्ज्ञ यांची संरचित माहिती (डेटाबेस) तयार करण्यात येईल.
- विभाग 5 - **शिक्षक** यामध्ये 5.11 नुसार नमूद आहे, पालक आणि इतर मुख्य संबंधित घटक यांच्या सहयोगाने शिक्षक, शाळा व्यवस्थापन समिती/ शाळा समूह व्यवस्थापन समिती सदस्य या भूमिकेसह शाळा/शाळा समूह यांच्या कारभारात सक्रिय सहभाग नोंदवतील.
- विभाग 6 - **समन्यायी आणि समावेशित शिक्षण : सर्वांसाठी शिक्षण** यामध्ये 6.5 नुसार नमूद आहे, उपस्थिती आणि अध्ययन निष्पत्ती यांत सुधारणा करण्यासाठी विद्यार्थी, पालक, शाळा आणि काम करणारे शिक्षक तसेच संपर्कात असलेले समुपदेशक आणि सुशिक्षित सामाजिक कार्यकर्ते हे शहरी, गरीब क्षेत्रांतील विद्यार्थ्यांसाठी विशेष प्रभावी असल्याचे दिसून आले आहे.
- विभाग 7 - **शाळा संकुल समूह या माध्यमातून कुशल संसाधन आणि प्रभावी प्रशासन** यामध्ये 7.7, 7.9 व 7.12 नुसार नमूद आहे,

  7.7 - शाळा संकुलांमध्ये सामाजिक कार्यकर्ते आणि समुपदेशक यांची देवाण-घेवाण केली जाईल आणि त्या माध्यमातून विद्यार्थ्यांसाठी अधिक चांगल्या साहित्याची उपलब्धता करता येईल. याद्वारे 100% पटनोंदणी,100% उपस्थिती आणि विद्यार्थ्यांची कामगिरी यांमध्ये सुधारणा घडवून आणता येईल. शाळा संकुल व्यवस्थापन समित्यांच्या माध्यमातून मजबूत आणि सुधारित शासन संनियंत्रण, देखरेख केली जाईल आणि नवोपक्रम, स्थानिक हितधारकांकडून घेतला जाणारा पुढाकार यांना प्रोत्साहन दिले जाईल. शाळा, शाळा प्रमुख, शिक्षक,

विद्यार्थी, सहयोगी कर्मचारी वर्ग, पालक आणि स्थानिक नागरिक या मोठ्या समुदायाच्या माध्यमातून संसाधनांचा प्रभावी उपयोग करून संपूर्ण शालेय व्यवस्था समर्थ केली जाईल.

7.9- शाळा संकुल/समूह यांच्या माध्यमातून दीर्घकालीन व अल्पकालीन संदर्भात योजनाबद्ध पद्धतीने काम करणाऱ्या संस्कृतीचा विकास होईल. शाळा आपल्या शालेय व्यवस्थापन समित्यांच्या मदतीने आपले आराखडे(SDPs) बनवतील. शाळा आराखड्यांच्या आधारावर शाळा संकुल/समूह विकास आराखडा(SCDP) बनविला जाईल, शाळा संकुल/समूह विकास आराखडा यामध्ये शाळा संकुलाशी संबंधित इतर सर्व संस्था, जसे व्यवसाय शिक्षण संस्था, यांसारख्या इतर संस्थांच्या आराखड्यांचा समावेश असेल. शाळा संकुलाचे प्राचार्य आणि शिक्षक SCMC च्या मदतीने हा आराखडा तयार करतील आणि हा आराखडा सर्वांसाठी उपलब्ध करून दिला जाईल. या आराखड्यात मानवी संसाधने, अध्ययन संसाधने, भौतिक संसाधने आणि पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करण्यासाठीचे पुढाकार, वित्तीय संसाधने,शाळा संस्कृती संबंधी पुढाकार,शिक्षक विकास आराखडा आणि शैक्षणिक फलनिष्पत्ती यांचा समावेश असेल. त्यात शाळा संकुलामधील शिक्षक व विद्यार्थी यांच्यासाठी शाळा संकुल हे एक चैतन्यशील अध्ययन केंद्रित समुदायाच्या स्वरूपात विकसित करण्याच्या प्रयत्नांचा तपशील देखील दिला जाईल.

7.12- शाळा ही संपूर्ण समुदायासाठी उत्सवाचे ठिकाण असायला हवी. एक संस्था म्हणून शाळेची प्रतिष्ठा पुनःस्थापित करायला हवी आणि यासाठी शाळा स्थापना दिवस यासारख्या महत्त्वपूर्ण दिवसास समुदायाबरोबर साजरे केले गेले पाहिजे. या दिवशी शाळेच्या विशिष्ट माजी विद्यार्थ्यांची यादी प्रसिद्ध केली पाहिजे आणि त्यांचा सन्मान केला पाहिजे. शिवाय शाळेच्या वेळांव्यतिरिक्तचा वेळ किंवा शाळेच्या सुट्टीच्या दिवसांत शाळेच्या भौतिक सुविधांचा वापर समुदायाच्या बौद्धिक, सामाजिक आणि स्वयंसेवी उपक्रमांच्या आयोजनासाठी तसेच सामाजिक एकत्रीकरणासाठी केला गेला पाहिजे. त्यामुळे शाळेचा एक सामाजिक चेतना केंद्र म्हणून वापर केला जाऊ शकतो.

**विभाग 8 - शाळा शिक्षणासाठी मानक निर्धारण आणि मूल्यांकन यामध्ये 8.6 नुसार नमूद आहे,**

8.6- शाळा,संस्था,शिक्षक,अधिकारी,समुदाय आणि भागधारक यांना सक्षम बनविणे आणि यासाठी त्यांना संसाधनांनी परिपूर्ण बनविण्याचे काम करणारी संस्कृती, संरचना आणि व्यवस्था या सर्वांची जबाबदारी निश्चित केली जाईल. प्रत्येक भागधारक आणि शिक्षाप्रणालीमधील भागीदार व्यक्ती उच्चतम प्रामाणिकपणा, पूर्ण प्रतिबद्धता आणि अनुकरणीय कार्यनीती या स्वरुपात कार्य करण्यास जबाबदार असतील. व्यवस्थेच्या प्रत्येक भागधारकापासून जी अपेक्षा आहे ती स्पष्ट केली जाईल. या अपेक्षेनुसार कामाचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन होईल. जबाबदारी निश्चित करताना मूल्यांकन प्रणाली स्वतःला एक उद्देशपूर्ण आणि विकासाभिमुख प्रक्रियेच्या रूपात विकसित करेल.

**शालेय नेतृत्वाच्या दृष्टिकोनातून मोड्यूलची उपयुक्तता-**

मुख्याध्यापक म्हणून शाळेचे नेतृत्व करीत असताना मुख्याध्यापकांना अनेक जबाबदाऱ्या पेलाव्या लागतात. शाळेतील शिक्षक, विद्यार्थ्यांचे पालक, गावकरी, शालेय व्यवस्थापन समिती, अधिकारी, पदाधिकारी अशा विविध घटकांशी समन्वय साधून काम करावे लागते. बऱ्याचदा समस्या निर्माण होतात, आव्हानांना सामोरे जावे लागते. यातील एक प्रमुख आव्हान म्हणजे समाजाशी सुसंवाद साधून शाळेसाठी समाज सहभाग मिळविणे. प्रस्तुत मोड्यूलमधील मुख्याध्यापकांच्या यशोगाथेचे अवलोकन केले, तर शाळेसाठी समाज सहभागाची अडचण कशी दूर करावी, समाजाला शाळेशी कसे जोडावे यासंदर्भात निश्चितच दिशा मिळेल. शाळेची प्रगती आणि विद्यार्थ्यांची शालेय गुणवत्ता संवर्धित करण्यासाठी समाजाचा सहभाग कसा घेता येईल, याबाबतच्या उपायांचे आकलन या घटकसंचातून होईल. सर्व संबंधित घटकांशी योग्य ताळमेळ कसा साधावा, प्रतिकूल परिस्थितीतून कसा मार्ग काढावा, संघ बांधणी करून अध्ययन संस्कृती कशी निर्माण करावी, शाळेमध्ये शाश्वत बदल कसे घडवून आणावे यादृष्टीने शाळा प्रमुखांची भूमिका व जबाबदारी या घटकसंचाच्या माध्यमातून समजून घेता येईल.

**संदर्भ साहित्य : –**


1. शालेय नेतृत्व विकास कार्यक्रमा संदर्भातील महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (MIEPA) औरंगाबाद या संस्थेचे 4 MODULE.
2. One month certificate course in school leadership and management – Resource book, NCSL, NIEPA, New Delhi.
3. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम – 2009 (RTE- 2009)
4. महाराष्ट्र शासन परिपत्रक - 16 मे 1996 व 24 ऑगस्ट 2010
5. माध्यमिक शाळा संहिता
6. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण – 2020
7. NISHTHA प्रशिक्षण हस्तपुस्तिका - संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे.



| **मोड्यूल विकसक** | **समन्वयन** | **मार्गदर्शक** |
|---|---|---|
| डॉ.राजेश माणिकराव चौधरी | डॉ.ज्योती कुलकर्णी | डॉ.नेहा बेलसरे |
| अधिव्याख्याता, | समन्वयक | संचालक |
| प्रादेशिक विद्या प्राधिकरण | महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व | महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व |
| औरंगाबाद | प्रशासन संस्था (मिपा),औरंगाबाद | प्रशासन संस्था (मिपा),औरंगाबाद |